THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 9TH OCTOBER 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख ११ वी सेप्टेंबर सन १८९० रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९० चा आक्ट १६ वा.

**सन १८८६ चा जन्म, मृत्यु व लग्नें नोंदण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्या अर्थीं सन १८८६चा जन्म, मृत्यु व लग्नें नोंदण्याविषयींचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थीं या आक्टावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविलें आहे:—

सन १८८६च्या ६व्या आक्टाच्या ३२व्या कलमाची सुधारणूक.

१. सदर्हू आक्टाच्या ३२व्या कलमांत, "हा आक्ट अमलांत येतो त्या तारखेपासून एक वर्षाच्या आंत" या शब्दांच्या ऐवजीं "सन १८९१ च्या एप्रिलच्या पहिल्या तारखेपूर्वी कोणत्याहि वेळीं" हे शब्द दाखल करावे.

सन १८८६ च्या ६व्या आक्टांत नवीन कलम ३५अ दाखल करणें.

२. सदर्हू आक्टाच्या ९व्या बाबींत खालीं सांगितलेलें कलम दाखल करावें, ह्मणजे:—

या बाबीच्या कारणांसाठीं जास्त कमिशनांची रचना.

"३९ अ. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस योग्य वाटल्यास ते, इंडिया ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, या बाबीच्या कारणांसाठीं एकाहून अधिक कमिशनें नेमण्यास मुखत्यार आहेत; अशा प्रत्येक कमिशनांत, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे सदर्हू प्रकारें जाहिरनामा प्रसिद्ध करून नांवानें किंवा हुद्यानें जितके व जे जे मेंबर नेमतील, तितके व ते ते मेंबर असतील, आणि त्या प्रत्येक कमिशनाचें, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे सदर्हू प्रकारें जाहिरनामा प्रसिद्ध करून या बाबतींत निर्दिष्ट करितील त्या रेजिस्ट्रार जनरलाकडे किंवा रेजिस्ट्रार जनरलांकडे ३२व्या

कलमाअन्वयें पाठविलेल्या रेजिस्टरांची किंवा कागदपत्रांची, या आक्टास व या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंस अनुसरून, व्यवस्था करणें एवढेंच काम आहे असें समजावें.

"(२) पोट-कलम (१) यावरून दिलेला अधिकार चालवून एकाहून अधिक कमिशनें नेमण्यांत आल्यास, या आक्टांत कमिशनरांवर दिलेले हवाले, याप्रमाणें नेमलेल्या कमिशनाच्या मेंबरांवर दिले आहेत असें समजून त्यांचा अर्थ केला पाहिजे."

(True Translation)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.